# प्रकरण दुसरे

# संशोधन पध्दती

## प्रकरण - २

# संशोधन पध्दती

२.१ प्रस्तावना

२.२ समाजशास्त्रीय दृष्टीकोण

२.३ सामाजिक संशोधन व पत्रकारिता

२.४ संशोधन पद्धती

२.५ अन्वेषणात्मक संशोधन आराखडा

२.६ साहित्य समालोचन

२.७ सामाजिक सर्वेक्षण

२.८ आशय विश्लेषण

२.९ संशोधनाची उद्दिष्टे

२.१० गृहितके

२.११ संशोधनाच्या मर्यादा

२.१२ समारोप

## २.१ प्रस्तावना

जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण यामुळे विकास क्षेत्राची व्यापकता वाढत आहे. प्रगत संवाद साधनांमुळे माहितीच्या आदान-प्रदानाचा व प्रसारणाचा वेग वाढला आहे. वृत्तपत्रक्षेत्रातही या बदलाचा प्रत्यय दिसून येत आहे. वृत्तपत्रे समाजजीवनात आधुनिकीकरणाची मूल्ये रुजवितात आणि लोकांच्या अभिरुचीत बदल घडविण्यास प्रवृत्त करतात. मनोरंजनात्मक पत्रकारितेच्या चिकित्सक अभ्यास दैनिक संध्यानंद व दै. लोकमत वाचकांच्या विशेष संदर्भात या विषयावरील प्रस्तूत प्रबंधात वापरावयाच्या संशोधन पध्दतीचे सविस्तर विवेचन या प्रकरणात करावयाचे आहे. नवीन समाज व्यवस्थेत एक नवीन विकास संस्कृती व नवीन जीवनशैली तयार करण्यात प्रेरक शक्ती म्हणून वृत्तपत्रांचे कार्य अत्यंत महत्वाचे असते.

मार्शल मॅकलुहानने म्हटल्याप्रमाणे संवाद क्रांतीमुळे जग हे एक खेडे बनले आहे. इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या प्रसारामुळे ‘मनोरंजनात्मक पत्रकारिता’ ही प्रभावशाही ठरु लागली आहे. जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेमध्ये सामाजिक संशोधनाचे स्वरुप झपाट्याने बदलत आहे.[१] समाजावरील माध्यमांच्या परिणामांचा अभ्यास सर्वच काळात इतिहासकार, जनसंवाद शास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, राजकीयतज्ञ, शास्त्रज्ञ, लेखक व समीक्षक यांच्याकरिता अभ्यासाचा विषय राहिलेला आहे.

‘मनोरंजनात्मक पत्रकारिता’ या पत्रकारितेच्या आजच्या युगातील महत्त्वाच्या अंगाबाबत मत व्यक्त करताना एल.डब्ल्यु. डूब म्हणतात, “The role of Mass-media to a modern form, The contribution of media Can best be seen.”[२] पारंपरिक समाजाचे आधुनिक समाजात स्थितंतर करण्यात हस्तांतरामुळे विकसनशील देशांमध्ये विकास प्रक्रियेचा वेग वाढत आहे. वृत्तपत्र हे माध्यमही त्यात महत्वाचा वाटा उचलीत आहे. नवीन शतकातील नवीन जीवनशैली आकार घेत असतांना ‘मनोरंजन’ हा त्यांच्या जीवनशैलीचा एक महत्वाचा

घटक आहे. मनोरंजनात्मक पत्रकारितेचा अभ्यास करताना प्रथम विकास व आधुनिकीकरण ह्या संकल्पना अभ्यासल्या जातात.

लर्नर आणि श्रॅम या जनसंवाद तज्ञांनी समाजाच्या आधुनिकीकरणात व विकासात माध्यमांचा मोठा वाटा असल्याचे प्रतिपादन केले आहे. त्यांच्या मते, “Mass Media Prepare, Integrate and Undergrid the development of modern Society.” [३] आधुनिक समाजाची विकासविषयक मानसिकता बदलण्याचे कार्य प्रसार माध्यमे करतात. माध्यमांचे सामाजिक परिवर्तनाचे सामर्थ्य हे आधूनिक तंत्रज्ञानामुळे गतिमान होत आहे. सामाजिक संशोधनाची व्याप्ती मानवी वर्तनास समकक्ष अशी आहे. स्थळ, काळ व संस्कृतीप्रमाणेच जनसंवाद साधनांचा मानवी वर्तनावर परिणाम होतो. नव्या समाज व्यवस्थेची जडण-घडण करण्यात प्रसारमाध्यमांचे योगदान समजून घेताना एक विश्वासार्ह माध्यम म्हणून वृत्तपत्रांचे कार्य महत्त्वाचे ठरते. ‘मनोरंजनात्मक पत्रकारितेचा चिकित्सक अभ्यास’ या पत्रकारितेतील विकसित होणाऱ्या नव-नवीन घटकांचा व वार्ता विषयाचा अभ्यास यात करण्यात येत आहे. लर्नर यांच्या मते, “The Media Presents New objects and ideas which engage and archival the capacity and stimulate the development.” [४] माध्यमे नवीन वास्तव आणि नव्या कल्पना लोकांना सादर करुन त्यात त्यांना सहभागी करुन घेतात व त्यांची क्षमता वाढवून विकास प्रक्रियेला चालना देतात.

एकविसाव्या शतकातील आधुनिक समाजात परंपरा व आधुनिकता असे द्वंद्व चालू असताना या प्रक्रिया वृत्तपत्रांच्या आशयातून प्रकट होत असतात याचा शास्त्रीय दृष्टीकोनातुन अभ्यास होणे महत्वाचे आहे. समाजावरील माध्यमांच्या परिणामांचा अभ्यास हा सर्वच काळात होत आला आहे. अशा प्रकारच्या अभ्यासाचे महत्व प्रतिपादित करताना कमलेश महाजन म्हणतात, “Culturally and economically the study of Communication in India at

the Present Structure is great.” [५] सध्याच्या काळात भारतात सांस्कृतिकदृष्ट्या व आर्थिकदृष्ट्या जनसंवादाच्या अभ्यासाचे महत्व अनन्य साधारण आहे.

‘मनोरंजन पत्रकारिता’ हा देशाच्या विकासप्रक्रियेतील माध्यमांच्या भूमिकेतील एक महत्वाचा घटक आहे. माध्यमे विकासाची नवी विचारधारा प्रस्तूत करुन त्यांना चालना देतात व त्यातुन विकासाला गती मिळते. नवीन विषयाच्या आकलनाबाबत कमलेश महाजन पुढे म्हणतात, “Communication played a vital role in Nation building and development as it exposed the people to various problems and issues.” [६] राष्ट्र निर्मिती व विकासात ‘संवाद’ महत्वाची भूमिका पार पाडत लोकांसमोर विविध मुद्दे व समस्या उघड करीत असतो. मॅनफ्रेड बार्थेल यांच्या नुसार “Newspapers are the tounges of the times” [७] वृत्तपत्रे ही त्या त्या कालखंडातील वाचा आहेत.

वृत्तपत्रांचा उदय सामाजिक बांधिलकीच्या उद्देशातून झालेला असल्यामुळे समाजाच्या उन्नतीसाठी, प्रबोधनासाठी ती झटत असल्यामुळे संशोधनाचा हा विषय सामाजिक शास्त्रांशी निगडीत आहे. कोणत्याही सामाजिक संशोधनात शास्त्रीय पध्दतीचा अवलंब केल्यामुळे नवीन तंत्रे प्रकाशात आणता येतात. तसेच प्रस्थापित ज्ञानात नव्या ज्ञानाची भर टाकता येते. कार्ल पियरसन यांच्या मते, “विश्वाबाबतचे ज्ञान शास्त्रीय पध्दतीच्या कक्षातुनच घेण्याखेरीज दुसरा पर्याय नाही.” [८] समाजाचा विकास होण्यासाठी वृत्तपत्रे समाजमन तयार करतात, चालना देतात व त्यातून नवीन समाज व नवीन संस्कृती तयार होण्यास मदत होते. या संशोधनात ‘मनोरंजनात्मक पत्रकारिता’ या संकल्पनेच्या सविस्तर अभ्यास करुन प्रादेशिक वृत्तपत्रातील त्याच्या बदलत्या स्वरुप व आशयाबरोबरच वाचक पाहणीद्वारे त्यातील तथ्ये उलगडण्यावर भर दिला आहे. आशय विश्लेषणातून दोन दैनिकातील मंनोरंजनात्मक घटकांचा तौलनिक अभ्यास करुन सारणी व आलेखाद्वारे त्याचा अहवाल मांडण्यात येणार आहे. त्यामुळे नवीन समाज

दृष्टीने 'मनोरंजनात्मक पत्रकारिता' आणि त्याचा वाचकांशी असलेला संबध या अभ्यासात तपासावयाचा आहे.

डॉ. पु.ल. भांडारकर म्हणतात, "शास्त्र ही विश्वातील क्रियाप्रक्रियांची वा घटनांची सुसंगती लावण्याचा व त्याचे यथार्थ ज्ञान करुन देण्याच्या प्रयत्न करणारी एक बौध्दिक वा वैचारिक योजना असून शक्य तितक्या सुलभपणे, अचूकपणे व संपूर्णपणे अनुभव कक्षेत येणाऱ्या तथ्यांचे ते सप्रमाण सिध्द करता येतील अशा पध्दतीने त्यांचे वर्णन व संकल्पीकरण करणे हाच शास्त्राचा आशय होय."[९] सामाजिक संशोधनामध्ये प्रथम अशा संकल्पनाचे यथार्थ आकलन करुन घेणे ही पहिली पायरी असते. संशोधन (Research) या संज्ञेचा शब्दश: अर्थच मुळात Re-search म्हणजे पुन:पुन्हा शोध घेत राहणे असा आहे.

'मनोरंजनात्मक पत्रकारिता' ही नवीन सहस्त्रकातील माध्यम संशोधनातील एक महत्वाची संकल्पना आहे. एडवर्ड हेरॉल्ड यांच्या मते, "वृत्तपत्रांचा मालकी प्रकार कोणताही असला तरी वृत्तपत्र ही एक आवश्यक सामाजिक संस्था असते." [१०] यामुळे वृत्तपत्रांचा शास्त्रीय अभ्यास करताना सामाजिक संशोधनातील निकष शास्त्रीयपणे वापरावे लागतात. सामाजिक संशोधनात विविध साधनांचा उपयोग करुन प्रथम तथ्ये शोधावी लागतात. तथ्य संकलनाच्या नवनवीन पध्दतींचा वापर करुन, गृहितके पडताळणी करुन प्रमेयांची पध्दतशीर मांडणी करावी लागते त्यातुन नव्या ज्ञान प्रवाहाचा विकास होत असतो. "मनोरंजनात्मक पत्रकारितेचा चिकित्सक अभ्यास" या संशोधनात त्या संपूर्ण संकल्पनेचा शास्त्रीय अभ्यास मांडावयाचा आहे.

## २.२ समाजशास्त्रीय दृष्टीकोन :

मनोरंजनात्मक पत्रकारितेचा अभ्यास करतांना येथे समाजशास्त्रीय दृष्टीने विचार करावयाचा आहे. प्रसारमाध्यमे माहिती, विश्लेषण, प्रबोधन व मनोरंजनही ही चार कार्य करतात. परंतु वर्तमान संदर्भात तर माध्यमे माहितीरंजन या कार्यावर अधिक भर देत आहेत माहिती रंजनाच्या प्रक्रियेतून संवाद माध्यमे समाजीकरणाच्या प्रक्रियेला गती देतात. ए.ए.बर्जर यांच्या मते. Socialization refers to the process by which people are taught He rules roles and value of the society. [११]

लोकांना सामाजिक नियम, भूमिका व मूल्ये यांचे आकलन ज्या प्रक्रियेद्वारे घडले त्यास सामाजिकरण म्हणतात. मनोरंजन पत्रकारिता हीसुद्धा समाजातील मूल्ये, रिती व संकेत यावर प्रभाव टाकत असते. त्यामुळे तिचा विचार येथे करावा लागणार आहे.

मनोरंजनात्मक पत्रकारितेचा परिघ वाढत आहे. डॉ. धारुरकर यांनी म्हंटल्याप्रमाणे जनसंवाद माध्यमातून केवळ मध्यमवर्गीय संस्कृतीची ओळख करुन देऊन चालणार नाही. जनसामान्यांच्या इच्छा आकांक्षाचे प्रतिबिंब वृत्तपत्रातून नभोवाणी व दुरदर्शन या माध्यमाद्वारे प्रकटले पाहिजे. त्यासाठी जनसंवाद माध्यमाचे समाजीकरण ही काळाची गरज होऊन बसली आहे. परंतु ही प्रक्रिया एखाद्याने केल्याने कृत्तीत येऊ शकेल असे नाही. सर्व माध्यमधुरिणांनी हे समाजीकरणाचे व्रत अंगीकारण्याची आवश्यकता आहे. [१२] मनोरंजनात्मक पत्रकारितेचा अभ्यास करतांना ही समाजशास्त्रीय दृष्टी पोषक ठरणार आहे.

प्रा. रा.ना. घाटोळे यांच्या मते, सामाजिक संशोधनामुळे विविध सामाजिक घटनांच्या बाबतीत वैज्ञानिक ज्ञान प्राप्त होते. त्यामुळे त्या घटनांविषयी आपल्या मनात जे अज्ञान असते ते नाहीसे होते. त्या घटनांची कारणे कळल्यामुळे उपाय योजना सुचू लागतात. [१३] मनोरंजनात्मक पत्रकारितेच्या विकास मार्गातील अडचणी व समस्या लक्षात घेऊन त्यावर

उपाय सुचित करणे ही बाब या शोधात अभिप्रेत आहे. विकसनशिल समाजामध्ये मनोरंजनाची निकड अधिक जाणवते. त्याचबरोबर मनोरंजनाचा दर्जाही उंचावला पाहिजे. प्रा. घाटोळे म्हणतात, "विकसनशील देशात सामाजिक नियंत्रणाची साधने नव्या बदललेल्या परिस्थितीत निरुपयोगी ठरतात. त्यामुळे नवीन साधने निर्माण होणे अथवा करणे आवश्यक ठरते." [१४] त्यामुळे हा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. प्रसारमाध्यमे आता सामाजिक नियंत्रणाचे काम प्रभाविपणे करत आहेत. जनसेवा पत्रकारिता ही समाजशास्त्रीयदृष्टीने अभ्यासली जात आहे. "भारतामध्ये आधुनिकतेच्या मार्गाकडे झेपावणारे राष्ट्र व प्रगतीच्या, पाऊलखुणा गोरगरीब समाज यांच्यासाठी जनकल्याण पत्रकारिता" हे एक वरदान आहे. एकीकडे समृध्दी व दुसरीकडे विपन्नावस्था हे विषम चित्र दुर करण्यासाठी पत्रकारिता हे जनसेवेचे माध्यम मानले तर शिघ्र सामाजिक व आर्थिक न्यायाची रचना करता येईल. [१५] त्यामुळे मनोरंजनात्मक पत्रकारितेचा हा अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

### २.३ सामाजिक संशोधन व पत्रकारिता :

वृत्तपत्रांचा उदय सामाजिक बंधिलकिच्या उद्देशातुन झालेला आहे. माहिती, ज्ञान व मनोरंजन यांच्या प्रसारातून वृत्तपत्रे समाजाच्या उन्नतीसाठी, प्रबोधनासाठी कार्यरत असल्यामुळे हा विषय सामाजिक शास्त्रांशी निगडित आहे. सामाजिक संशोधन ही संकल्पना स्पष्ट करतांना बी.एम. घोष म्हणतात, "Social research studies human behaviours and social problems. The main idea behind such research is to discover new interreaction, new knowledge, new facts and also verity old ones." सामाजिक संशोधनात मानवी वर्तनाचा व सामाजिक प्रश्नांचा अभ्यास केला जातो. अशा संशोधनाचा मुख्य उद्देश नवीन आंतर-संबधाचा, नवीन ज्ञानाचा, नवीन तथ्यांचा शोध घेऊन जुन्या तथ्यांची पडताळणी करणे असतो. या अनुषंगाने मनोरंजनात्मक पत्रकारितेचा अभ्यास करावयाचा आहे.

वृत्तपत्र संशोधन हे समाजाला व वृत्तपत्रांना नवी दिशा देणारे असते. प्रस्तुत संशोधनात असा अभ्यास करतांना एकविसाव्या शतकातील प्रादेशिक वृत्तपत्रातील मनोरंजनात्मक पत्रकारिता, त्याचे बदलते स्वरुप, त्याचा वाचकांवर होणारा परिणाम व मनोरंजनात्मक पत्रकारितेचे विविध पैलू हे केंद्रबिंदू मानले आहेत.

मानवी समाज सतत बदलत असतो. या सामाजिक बदलामागील गतित्व हे मूल्य जातिवंत असते. या मूल्य जानिवांना आकार देण्याचे कार्य समाजिक संस्था करतात. वृत्तपत्रे हीसुद्धा एक सामाजिक संस्था आहे. वृत्तपत्र हे माध्यम समाजाशी थेट निगडीत असल्यामुळे व त्याचा समाजात ज्ञान प्रसार, विचार व मनोरंजनासाठी उपयोग केला जात असल्यामुळे हा विषय सामाजिक शास्त्राशी निगडीत आहे. सामाजिक संशोधन या पार्श्वभूमीवर वृत्तपत्र संशोधनाचे स्वरुप स्पष्ट आहे.

समाजाला आधुनिक बनविण्यात व विकास प्रक्रियेत समाविष्ठ करण्यात वृत्तपत्रे मोलाची भूमिका पार पाडतात. एकविसाव्या शतकात 'विकास' ही संकल्पना पूर्णपणे बदलत आहे. वाढते शहरीकरण व महानगरीय संस्कृतिचा प्रभाव छोट्या व मध्यम शहरातील वृत्तपत्रांच्या वार्तांच्या सादरीकरणातूनही प्रकट होताना दिसत आहे. कमलेश महाजन यांच्या मते, "Modernisation refers to a process by which a change occurs in the mental outlook of the people. Their world view changes. The process refers to the spread of value orientations collectively known as modernity." [१७]

लोकांच्या मानसिक दृष्टिकोनात होणारा बदल आधुनिकीकरण घडवून आणु शकतो. ही प्रक्रिया त्यांचा जगाकडे पाहाण्याचा दृष्टिकोन बदलवतो. मूल्य निर्धारणाची ही प्रक्रीया म्हणजेच आधुनिकीकरण होय. वृत्तपत्रे अशाप्रकारे आधुनिकीकरणाची प्रक्रिया गतिमान करतात. मनोरंजनात्मक पत्रकारिता ही संकल्पना बदलत्या समाजानुसार बदलत आहे. कारण

एकविसाव्या शतकात सामाजिक, आर्थिक व माध्यमांचे स्वरुपही बदलत आहे. माध्यमांच्या बहुविध उपलब्धतेमुळे लोकांना माहिती व मनोरंजनासाठी अनेक पर्याय उपलब्ध झाले आहेत. असे असले तरीही वृत्तपत्र हे माध्यम आपली विश्वसनियता व अस्तित्त्व टिकवून आहे. रॉबिनसन्स यांच्या मते, "The policy for communications today and for the future is exceedingly rich with diverse complex and important issue." [१८]

आजच्या व भविष्यातील संवादाचे धोरण हे संपन्न परंतु जटील व महत्त्वपूर्ण असा मुद्दा आहे. हा मुद्दा केंद्रस्थानी मानून या प्रबंधात मनोरंजनात्मक पत्रकारिता या विषयाचा सविस्तर व सर्व पैलूंचा, आशयांचा व वाचकांचा समाजशास्त्रीय दृष्टीने अभ्यास करुन आजच्या मुद्रीत माध्यमातील मनोरंजनात्मक पत्रकारितेचे नवीन स्वरुप व नवीन वार्ता विषयांचे आकलन करावयाचे आहे. कारण पारंपरिक समाजात नवा विचार रुजविण्याचे कार्य वृत्तपत्रे करीत असतात व त्यातून नवीन दृष्टीकोन विकसित होण्यास मदत होते.

**२.४ संशोधन पद्धती :**

कोणत्याही संशोधनासाठी योग्य संशोधन पद्धतीची गरज असते. वृत्तपत्रांच्या आशयात, वार्तांकनात व सादरीकरणात होणारे बदल व त्याचा सामाजिक प्रभाव अभ्यासण्यासाठी व मनोरंजनात्मक पत्रकारितेचा चिकित्सक अभ्यास करुन निष्कर्षाप्रत पोहोचण्यासाठी आशय विश्लेषण व सामाजिक सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी तथ्य संकलन हा मुळ कार्यभाग आहे. साल्टीश जहोडा यांच्या मते, "शास्त्रीय निष्कर्षापासून आपले पूर्वग्रह व आपल्या कल्पना पृथक ठेवण्याचा प्रयत्न संशोधकाने सतत करीत राहिला पाहिजे." [१९]

वस्तुनिष्ठता हा सामाजिक संशोधनाचा आत्मा आहे. संवाद शास्त्रातील कोणत्याही संशोधनाला अंतिम स्वरुप देण्यासाठी निश्चित पद्धतीचा स्वीकार करणे महत्त्वाचे असते.

सामाजिक संशोधनात विविध साधनांचा उपयोग करुन प्रथम तथ्ये शोधावी लागतात. तथ्य संकलनाच्या नवनवीन पद्धतीचा वापर करुन गृहितके पडताळणी करुन प्रयोगांची पद्धतशीर मांडणी करावी लागते व त्यातुन नव्या ज्ञानप्रवाहांचा विकास होत असतो.

कार्ल पिअरसन यांच्या मते, ‘‘तथ्ये कोणत्या प्रकारची असावित यावर शास्त्राचे कोणत्याही प्रकारचे बंधन नसते, तथ्ये म्हणजे शास्त्र नव्हे, तर तथ्यांना हाताळण्याची पद्धतच शास्त्र आहे.’’ [२०]

मनोरंजनात्मक पत्रकारिता या विषयाचा अभ्यास करण्यासाठी आशय विश्लेषणाबरोबरच सामाजिक सर्वेक्षणातंर्गत वाचकांचा प्रश्नावलीद्वारे कल जाणून घेण्यात येईल.

## २.५ अन्वेषणात्मक संशोधन आराखडा:

कोणत्याही संशोधनासाठी आराखडा तयार करणे आवश्यक असते तसेच जेंव्हा संशोधनाचा विषय ताजा व नवा असतो व ज्यामध्ये कार्यकारण भाषेचा उलगडा करायचा असतो तेंव्हा अन्वेषणात्मक संशोधन आराखडा वापरणे उचित ठरते. डॉ. पु.ल. भांडाकरकर यांच्या मते, ‘‘पुढे गृहितकृत्यांची मांडणी करता यावी किंवा संशोधन समस्येचे स्पष्टीकरण करता यावे या उद्देशाने जी अध्ययने प्रेरित झालेली असतात त्यांना अन्वेषणात्मक अध्ययने म्हणता येईल.’’ [२१]

पूर्वनियोजन हा आराखड्याचा आत्मा असतो त्याशिवाय कोणतेही संशोधन पूर्ण होत नाही. संशोधन आराखड्याची व्याख्या करतांना बोधनकर म्हणतात, ‘‘संशोधन कार्यात निर्माण होणाऱ्या समस्यांना समर्थपणे आणि यशस्वीपणे तोंड देण्यासाठी संशोधन कार्याची निश्चित केलेली रुपरेषा म्हणजे संशोधन आराखडा होय.’’ [२२] संशोधनाची पूर्व तयारी म्हणजे योग्य

आराखड्याची निवड होय. मनोरंजनात्मक पत्रकारिता ही पत्रकारितेतील नवीन संशोधन शाखा आहे. त्यावरील पुर्वाभ्यास उपलब्ध नाही. डॉ. पु.ल. भांडारकर यांच्या मते "आराखडा बनविणे म्हणजे नियोजित कार्यात उपस्थित होणाऱ्या अडचणी व समस्यांचा विचारपूर्वक अंदाज घेऊन त्या समस्या व अडचणीच्या निराकरणाची आगाउ व्यवस्था करुन घेण्याच्या प्रक्रियेस संशोधन आराखडा असे म्हणतात." [२३]

संशोधन कार्याद्वारा घेण्यात येणाऱ्या व विशिष्ट क्रमाने मांडल्या जाणाऱ्या निर्णयामधूनच संशोधन आराखडा साकार होत जातो. संशोधनाच्या वेगवेगळ्या पैलूंच्या नियंत्रणाचा प्रश्न संशोधनकर्त्यास प्रत्यक्ष संशोधनास प्रारंभ करण्यापुर्वीच संशोधन आराखडा तयार करावा लागतो.

मनोरंजनात्मक पत्रकारितेचा चिकित्सक अभ्यास हा विषय संशोधनाच्या क्षेत्रात नवीन आहे व ताजा आहे त्यामुळे त्यावरील पुर्वाभ्यास अत्यंत कमी उपलब्ध आहे त्यामुळे प्रस्तुत संशोधनासाठी अन्वेषनात्मक संशोधन आराखडा वापरणे संयुक्तिक ठरणार आहे.

मनोरंजनात्मक पत्रकारितेचा चिकित्सक अभ्यास (संध्यानंद व लोकमतच्या विशेष संदर्भात) या संशोधनासाठी मनोरंजनात्मक पत्रकारिता, स्वरुप व विकास, वाचकांचा प्रतिसाद तपासून पाहातांना विविध घटकातील कार्यकारणभाव स्पष्ट करणारे अन्वेषनात्मक संशोधन आराखडे वापरणे उपयुक्त ठरते. जेंव्हा संशोधनाचा विषय ताजा व नवीन असतो व ज्यामध्ये कार्यकारणभावाचा उलगडा करावयाचा असतो तेंव्हा अन्वेषनात्मक संशोधन आराखडा वापरणे उचित ठरते.

अन्वेषनात्मक संशोधन आराखड्याची सविस्तर व्याख्या करतांना शेल्डस पॅट्रीशिया आणि रंगराजन म्हणतात, "Exploratory research is research conducted for a problem that has not been clearly defined. It often occurs before we know

enough to make conceptual distinctions or posit and exploratory relationship"[२४]

ज्यावेळी संशोधन समस्येचे स्वरुप स्पष्टपणे अधोरेखीत झालेले नसते व त्यासंबधीचा पूर्वाभ्यास उपलब्धा नसतो अशावेळी अन्वेषणात्मक संशोधन आराखडा उपयोगी ठरतो.

डॉ. पु.ल. भांडारकर यांच्यानुसार, "सद्य परिस्थितीमध्ये नवनवीन अनुभव व अंर्तदृष्टी प्रदान करणाऱ्या अन्वेषणात्मक अध्ययनाची नितांत आवश्यकता आहे." [२५]

या अभ्यासात दोन दैनिकातील मनोरंजनात्मक पत्रकारितेचे तौलनिक अध्ययन करावयाचे आहे. मनोरंजन पत्रकारितेची संकल्पना कशी बदलत आहे हे तपासायचे आहे. अर्थपूर्ण गृहितकृत्यांच्या निर्मितीसाठी हाती घेण्यात आलेल्या अन्वेषनात्मक अध्ययनासाठी परिणामकारक ठरणाऱ्या स्त्रोत व पद्धतीबाबत विवेचन करावयाचे आहे. डॉ. पु.ल. भांडारकर यांच्या मते, "गृहीतकृत्यांची मांडणी करता यावी किंवा संशोधन समस्येचे स्वरुप स्पष्ट करता यावे या उद्देशाने ही अध्ययने प्रेरित झालेली असतात. त्यांना अन्वेषनात्मक अध्ययने म्हणता येतील." [२६] वृत्तपत्र हे माध्यम सामाजिक परिवर्तनासाठी उपयुक्त ठरते कारण वृत्तपत्रांचा महत्त्वाचा उद्देशच सामाजिक परिवर्तनासाठी, नवीन विकास संकल्पनासाठी लोकांची मानसिकता तयार करणे हा आहे. मनोरंजनात्मक पत्रकारिता ही नवीन संकल्पना आज वाचक स्वीकारत असतांना त्यावर संशोधन होणे आवश्यक आहे व त्यावर पारंपरिक संशोधन उपयोगाचे नाही यासाठी अन्वेषनात्मक संशोधन आराखडा उपयुक्त ठरणार आहे.

माध्यमांच्या आशयात होणाऱ्या परिवर्तनाचा विशेषतः मनोरंजनात्मक पत्रकारितेचा अभ्यास यात मांडण्यात येणार आहे. समाजात बदल घडवून नवीन विचार प्रस्थापित करण्यात वृत्तपत्रे मोलाची भूमिका बजावतात. अन्वेषनात्मक आराखड्याची प्रस्तुत संशोधनासाठी निवड करतांना विषयातील नाविण्य व ताजेपणा व पूर्वाभ्यासाचा अभाव आहे. कारण वृत्तपत्रे ही

समाजाशी थेट निगडीत आहेत व समाजातील लोकांच्या आवडी-निवडी आपल्या वार्तांकनातून प्रतिबिंबित करत असतात. या बाबीचे महत्त्व विषद करतांना समाज शास्त्रज्ञ प्रा. काचोळे म्हणतात, समाज परिवर्तनीय स्वरुपत्वा असल्यामुळे भूतकाळातील अनेक बाबी वर्तमान व्यवस्थेत कालबाह्य ठरतात. बदलत्या समाज व्यवस्थेत पारंपरिक मूल्ये उपयोगी नसतात आणि तीच मुल्ये समाजावर बळजबरीने लादण्याचा प्रयत्न केल्यास समाजव्यवस्था धोक्यात येते. [२७]

जागतिकीकरण, उदारिकरण व खाजगीकरणामुळे भारतीय समाज व जनसंवाद माध्यमे सर्वांगाने बदलत आहेत. माहिती, प्रबोधन, ज्ञान प्रचार करणारी ही माध्यमे आता माहिती व मनोरंजन यांची सांगड घालून (इन्फोटेन्मेट) म्हणजे दोन्हींचा प्रसार करीत आहेत.

डॉ. भांडारकर म्हणतात, ‘‘संशोधनकर्ता ज्या विषयाचे अध्ययन करु इच्छितो त्या विषया संबधीच्या चौकशीस संरचनाबध्द असे स्वरुप देण्यासाठी संशोधनकर्त्यास विषयाच्या विभिन्न पैलूंची माहिती करुन देणे किंवा विषयाचे अध्ययन ज्या स्थितीत करण्याचा त्यांचा विचार असतो त्या स्थितीची चांगली माहिती करुन देणे अशी दोन्ही कार्य अन्वेषणात्मक अध्ययनाद्वारे साध्य व संपन्न होउ शकतात.’’ [२८]

अशा पद्धतीने अभ्यास विषयावर संशोधन करतांना साहित्य सर्वेक्षण, सामाजिक पाहणीचा अहवाल, व आशय विश्लेषण याचा आधार प्रस्तुत संशोधनासाठी घेतला आहे. या अभ्यासात दोन प्रादेशिक दैनिकातील सामग्रीचे तौलनिक अध्ययन करुन मनोरंजनात्मक पत्रकारितेचा अभ्यास केला आहे. प्रश्नावलीद्वारे वाचकांचे मत मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

प्रस्तुत संशोधनात मनोरंजनात्मक पत्रकारिता ही संकल्पना कशी विकसित होत आहे व त्यात नवीन वार्ताविषयांचा कसा समावेश होउन वाचकांचा त्याला कसा प्रतिसाद आहे याचे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न केला आहे.

## २.६ साहित्य समालोचन :

संशोधनासाठी सैध्दांतिक आधार  लागत असतात. संशोधन विषयासंदर्भात प्रकाशित साहित्याचे समालोचन करुन हे आधार मिळवले जाऊ शकतात. या संदर्भात प्रा. रा.ना. घाटोळे म्हणतात, ‘‘संबधित साहित्याचे अध्ययन किंवा साहित्य सर्वेक्षण ही पहिली आवश्यक अट आहे. कारण त्याशिवाय त्या विषयाला लागणारे पुर्वज्ञान प्राप्त होत नाही. अशा प्रारंभिक ज्ञानाशिवाय किंवा सैध्दांतिक आधाराशिवाय शोधकार्य करणे म्हणजे अंधारात चाचपडणे होय.’’ [२९] त्यामुळे प्रकाशित साहित्याचा आढावा घेतला असता पुढील संशोधनाचा मार्ग अधिक प्रशस्त व सुलभ होतो.

पु.ल. भांडारकर यांच्या मते, ‘‘संशोधनकर्त्याने निवडलेल्या विषयक्षेत्राशी संबधित साहित्याचे वाचन व मनन हा अन्वेषणात्मक अध्ययनातील एक महत्त्वाचा भाग होय. ज्या विषयाबाबत गृहितकृत्यांची मांडणी झालेली नाही अशा विषयासाठी अन्वेषणात्मक अध्ययने विशेष उपयुक्त असतात.’’ [३०] मनोरंजनात्मक पत्रकारिता हा एक नवा शोध विषय आहे. त्यामुळे त्याबाबतचे संशोधन हे अभ्यास विषयाला न्याय देउ शकते त्यासाठी साहित्य तपासने भाग पडते. अशा अध्ययनासाठी  ‘‘संशोधनकर्त्याने प्रथमतः त्या विषयाशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबधित साहित्य वाचून काढावे. असे वाचन करीत असतांना त्या साहित्याच्याआधारे काही गृहितकृत्य मांडता येण्यासारखे आहेत का याकडे सातत्याने लक्ष ठेवावे. काही विषयांबाबत आधीच्या संशोधनकर्त्यांनी काही गृहितकृत्ये मांडलेली असतील तर अशी गृहितकृत्ये एकत्र करुन पुढील संशोधनासाठी त्याचे काय महत्त्व असू शकते याचा अंदाज संशोधनकर्त्याने घ्यावा. तसेच त्या गृहितकृत्यावरुन नवीन काही गृहितकृत्य सुचण्यासारखे असल्यास तसा प्रयत्न करावा अशी अपेक्षा असते.’’ [३१] त्यामुळे संशोधनामध्ये प्रकाशित साहित्याचे समालोचन करुन अभ्यास विषयावर अधिक चांगला प्रकाश टाकणे शक्य होणार आहे. त्यासाठी येथे संबधित

पैलूवर ज्यांचा आपल्या संशोधनविषयाशी प्रत्यक्ष संबंध आहे त्या त्याच्यापुरतीच संदर्भसुची मर्यादित ठेवणे किंवा तेवढ्याच ग्रंथांचे साहित्याचे सर्वेक्षण करणे योग्य ठरणार नाही. ज्याचा संदर्भच सर्वस्वी निराळा आहे अशा दुसऱ्या विषयातील संशोधनात वापरल्या जाणाऱ्या संकल्पना व सिद्धांतानाही स्वक्षेत्रासंबधी गृहितकृत्ये मांडतांना चांगल्या प्रकारे उपयोग करुन घेता येतो. [३२]

या संशोधनासाठी समाजशास्त्र, मानसशास्त्र यासारख्या पुरक ज्ञानशाखामधील ग्रंथाचे वाचन करुन त्या आधारे अभ्यास विषयाला अधिक बळकटी द्यावयाची आहे. ही पुरकशास्त्रे या अभ्यासाला पोषक आहेत. बदलत्या समाजजीवनाचे अचूक आणि वस्तुनिष्ठ वर्णन प्रकाशित साहित्यात केले जाते. अशा समर्पक ग्रंथांचा वेध घेऊन गतकालीन जीवनाचे प्रवाह यथार्थपणे अभ्यासता येतात. असा प्रयत्न या संशोधनात करावयाचा आहे त्यामुळे मनोरंजनात्मक पत्रकारितेचा अभ्यास करणे शक्य होईल.

## २.७ सामाजिक सर्वेक्षण :

वृत्तपत्र ही एक सामाजिक संस्था आहे व त्याच्या प्रभावाचे मापन करतांना किंवा मुल्यमापन करतांना सामाजिक सर्वेक्षण पद्धती अत्यंत आवश्यक आहे. सामाजिक सर्वेक्षणाची व्याख्या करतांना ए.ए.बर्जर म्हणतात, "सामाजिक प्रगतीसाठी विधायक कार्यक्रम मांडण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून झालेले अध्ययन म्हणजे सामाजिक सर्वेक्षण होय." [३३]

या अभ्यासासाठी दै. सध्यानंद व दै. लोकमतच्या ३०० वाचकांचे प्रश्नावलीद्वारे प्रतिसाद नोंदवून त्यांचा अहवाल सारणी व आलेखाद्वारे मांडला आहे. मनोरंजनात्मक पत्रकारिता, त्यातील नवीन विषय नवीन वृत्तमुल्ये, बदलती परिमाणे याबाबत हे सामाजिक सर्वेक्षण आहे.

वृत्तपत्रे ही समाजात नवविचार रुजविण्यासाठी उपयोगी असे माध्यम आहे. त्यामुळे वाचकांच्या सर्वच गटावर त्याचा कमी अधिक प्रभाव पडतो. डॉ. भांडारकर यांच्या मते, ‘‘एखाद्या विशिष्ट समुहाच्या व गटाच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक, मनोरंजनात्मक पैलूंचे अध्ययन व विश्लेषण करुन त्यांच्यात समन्वय घडवून आणण्याचा प्रयत्न करणे म्हणजेच सामाजिक सर्वेक्षण होय.’’ [३४]

मनोरंजन पत्रकारिता ही वाचकांमध्ये विशेषतः महानगरातील युवकांना त्यांच्या आवडीचे सदर किंवा मजकुर देत आहे या सत्यास अनुसरुन प्रादेशिक वृत्तपत्रेही नव्या संगणक तंत्रज्ञानाचा व समाजाच्या बदलत्या मानसिक स्थिती व जीवनशैलीचा रोख ओळखून वार्तांबरोबरच मनोरंजनात्मक मजकुराला स्थान देत आहेत. त्याला मिळणारा प्रतिसाद कसा आहे व ही संकल्पना वाचकांना कशी वाटते याचा शास्त्रीय अभ्यास सामाजिक पाहणीच्या अहवालातून मिळू शकतो.

बी.एन.घोष यांच्या मते A social survey method is the way of approacting the problem in order to find out the truth involved in a problem certain steps must be takenin certain order and the ordered steps are called method. [३५]

सामाजिक सर्वेक्षण पद्धतीत समस्येला हात घालून सत्याचा शोध घेण्यासाठी सत्याच्या मुळाशी जाऊन विशिष्ट पायऱ्यांचा वापर करावा लागतो त्यास सर्वेक्षण पद्धती असे म्हणतात.

दै. संध्यानंद व दै. लोकमत या दैनिकातील मनोरंजनात्मक पत्रकारितेचे स्वरुप, त्याची वृत्तमूल्ये व त्यातून मनोरंजनात्मक पत्रकारितेचे विविध पैलू अभ्यासण्यासाठी त्यातील सदरांचे आशयविश्लेषन करण्यासाठी त्याबातच्या तथ्यांचे संकलन व वाचकांच्या सामाजिक सर्वेक्षणातून मिळालेल्या तथ्यांचे संकलन व विवेचन करणे महत्त्वाचे आहे. त्यामागचा उद्देश हा एकविसाव्या शतकातील विकसित होणाऱ्या मनोरंजनात्मक पत्रकारितेचा, नवीन वार्ता

विषयांचा, पत्रकारांच्या विशेषीकरणाचा अभ्यास करुन प्रादेशिक वृत्तपत्रांतील मनोरंजक पत्रकारितेचे वास्तव तसेच नवीन शतकात वृत्तपत्रांच्या आशयाचा, त्यांच्या सादरीकरणाच्या भूमिकेचा आढावा घेऊन ज्ञान प्राप्त करणे हा आहे.

वृत्तपत्र हे माध्यम समाजात नवीन मूल्ये रुजविण्यासाठी व नवीन जीवन संस्कृतीला चालना देण्यासाठी सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी संवाद माध्यम आहे.

अशा प्रकारे हे अध्ययन करतांना ३०० वाचकांची प्रादेशिक पातळीवर निवड करुन त्यांना बंदिस्त आणि मुक्त प्रश्नावलीच्याद्वारे संपर्क करण्यात आला आहे. व त्यातून येणाऱ्या माहितींची मांडणी ही सारणी व आलेखाद्वारे करण्यात येणार आहे.

**२.८ आशय विश्लेषण :**

सामाजिक संशोधनात आशय विश्लेषणाला महत्त्वाचे स्थान आहे. नवीन शतकातील मनोरंजनात्मक पत्रकारिता नवीन समाजमूल्ये, वाचकांची आवड, वार्तांचे बदलते विषय अभ्यासण्यासाठी आशय विश्लेषन ही संशोधन पद्धती उपयुक्त ठरते.

आशय विश्लेषणाचे तंत्र स्पष्ट करतांना बी. बेरलसन म्हणतात, संज्ञापनातील व प्रकट आशयाच्या वस्तुनिष्ठ व संख्यात्मक वर्णनाचे आशय विश्लेषण एक तंत्र आहे. अभ्यासाला पुरक होईल अशा तऱ्हेने विषयाचे तथ्य संकलन करणे व तथ्यांसाठी विविध मार्गांनी माहिती उपलब्ध करणे या तंत्राला आशय-विश्लेषण म्हणता येईल. [३६]

वृत्तपत्रांच्या अभ्यासासाठी व समिक्षेसाठी आशय-विश्लेषण ही पद्धती अत्यंत उपयुक्त आहे. शब्द, वाक्य, परिच्छेद आणि काळ ही आशय विश्लेषणाची एकके आहेत. त्यामुळे माध्यमांच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक अन्य दर्जा शोधणे सोपे होते. एखादे वृत्तपत्र कोणत्या विषयांना किंवा बातम्यांना महत्त्वाचे स्थान देते हेही ठरवता येते. आशय विश्लेषण ही व्यापक प्रक्रिया असून, या प्रक्रियेत परस्परांशी संबधित असणाऱ्या अनेक

कार्यांचा समावेश होतो. मिळवलेल्या माहितीचे वर्ग पाडणे, सांकेतिकीकरणाद्वारे पाडलेल्या वर्गाचे उपयोग करुन घेणे, सारण्या व कोष्टके बनविणे, संख्या शास्त्रीय निष्कर्ष काढणे इत्यादी आशय विश्लेषणाच्या समग्र क्रियेची उपांगे आहेत.

प्रस्तुत संशोधनात मनोरंजनात्मक पत्रकारिता या विषयाला निवडलेल्या वृत्तपत्रांनी कशा प्रकारे हाताळले आहे. त्यातील वृत्तमूल्ये व वार्ता-विषयातील विविधता व मिळालेले मुद्रीत क्षेत्र किती आहे हे अभ्यासण्याचा प्रयत्न केला आहे. या पद्धतीच्या उपयुक्ततेबाबत प्रा. भांडारकर यांनी म्हटले आहे आशय विश्लेषणात देण्यात येणाऱ्या व्याख्या पाहिल्यास आपणास हे आढळून येइल की संवादामधील उपलब्ध तक्त्यांच्या स्वरुपाऐवजी व्याख्या विश्लेषणाच्या पद्धतीवर जास्त भर देण्यात आला आहे. तक्त्यांच्या स्वरुपाच्या चर्चेऐवजी विश्लेषण कसे करावे या संबधीत स्पष्टीकरण आशय विश्लेषणाच्या व्यांख्यामधून करण्यात आलेला आढळतो. [३७] मनोरंजनात्मक पत्रकारितेचा अभ्यास याचदृष्टीने करावयाचा आहे. त्यासाठी 'दैनिक लोकमत' व 'दैनिक सध्यानंद' या वृत्तपत्रांचा अभ्यास करावयाचा आहे. असा अभ्यास पुढिलप्रमाणे करता येतो.

- आशय लक्षणाच्या निर्देशनासाठी केला जातो.
- आशयातील कारणे कोणती आहेत ते पडताळून पाहण्यासाठी केला जातो.
- आशयामध्ये परिणाम कोणते ते पाहाण्यासाठी असा अभ्यास केला जातो.

वरिल तीनही उद्देशांची पूर्तता येथे करावयाची आहे. येथे आशयविश्लेषण पध्दतीचा वापर करतांना पुढील घटक ठरविण्यात आले आहेत. [३८]

**१. कालावधी निश्चिती :** हा अभ्यास इ.स. २०१४ ते २०१५ या दोन वर्षाकरीता करावयाचा आहे.

**२. सामुग्री निश्चीती :** प्रस्तुत अभ्यासामध्ये 'दैनिक लोकमत' व 'दैनिक संध्यानंद' या दोन दैनिकांच्या संदर्भात अभ्यास करावयाचा आहे.

**३. मापन पद्धती :**

या अभ्यासामध्ये से.मी. पद्धतीने दैनिकांतील बातम्यांचे मापन करण्यात येणार आहे. तसेच असे मापन करतांना संख्यात्मक दृष्टीने जसा विचार करावयाचा आहे तसाच गुणात्मक दृष्टीने विचार करण्यात येइल.

**४. घटक निश्चिती :**

या अभ्यासात मनोरंजनात्मक सामग्रीचे वर्गीकरण करतांना एकूण दहा घटकांची सामग्री दोन्ही दैनिकामधून घेण्यात आली आहे. या प्रत्येक घटकास किती जागा दिली आहे व त्यातील घटक कोणते याचाही विचार करण्यात आला आहे.

अशा प्रकारे वृत्तपत्रांमधून कुठल्या प्रकारच्या आशयाला किती स्थान मिळाले यावरुन या वृत्तपत्राची भूमिका व दर्जा यांचा तुलनात्मक अभ्यास करतांना आशय विश्लेषन पद्धती अत्यंत उपयुक्त ठरते. आशय विश्लेषणाच्या तंत्राबाबत पी.व्ही. यंग म्हणतात, "Analysis of data is to be made with reference to the purpose of the study and its possible bearing on the scientific discovery" [३९] शास्त्रीय शोध लावण्याच्या दृष्टिने मिळवलेल्या संदर्भावरुन तसेच तथ्यांच्या संकलनावर केलेल्या विश्लेषण म्हणजेच आशय विश्लेषण होय.

**आशय विश्लेषण तंत्राची वैशीष्ट्ये :**

१. आशयाचे संकलित रुप कशा प्रकारे निर्देशित केले जाते.

२. कोणत्या माध्यमात विशिष्ट विषय कार्यक्रमासाठी दिलेली जागा, वेळ

३. माध्यमाचा वाचक/श्रोता /प्रेक्षक यावर होणारा परिणाम

४. माध्यमाच्या आशयातून / स्थानातून माध्यमांची भूमिका अभ्यासणे.

अशाप्रकारे वृत्तपत्रातील मनोरंजनात्मक मजकुराचा आशय विश्लेषण तंत्राद्वारे अभ्यास करावयाचा आहे.

## २.९ संशोधनाची उद्दिष्ट्ये :

कोणतेही सामाजिक संशोधन हे सुनिश्चित अशा उद्दिष्टांशिवाय पूर्ण होऊ शकत नाही समाजशास्त्रीय संशोधनामध्ये उद्दिष्टाचे महत्त्व सांगतांना प्रा. रा.ना.घाटोळे यांनी म्हटले आहे की, विशिष्ट उद्देश साध्य करुन घेण्यासाठी केवळ एक नव्हे तर एकापेक्षा अधिक साधने वापरावी लागतात. [४०] तसेच परिस्थिती आणि वातावरणही समजावून घ्यावे लागते. या पार्श्वभूमीवर मनोरंजनात्मक पत्रकारितेचा चिकित्सक अभ्यास, 'दै. संध्यानंद' व 'दै. लोकमत' वाचकांच्या विशेष संदर्भात या विषयावरील संशोधनाची उद्दिष्टे पुढिलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहेत.

१. मनोरंजनात्मक पत्रकारितेचा अभ्यास करणे
२. मनोरंजनात्मक पत्रकारितेच्या स्त्रोतांचा अभ्यास करणे
३. मनोरंजनात्मक पत्रकारितेतून संशोधनाच्या संवादाचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करणे.
४. मनोरंजनात्मक पत्रकारितेतून होणारे प्रबोधन, लोकशिक्षण इत्यादींचा अभ्यास करणे व प्रभाव तपासणे.
५. मनोरंजनात्मक पत्रकारितेच्या मर्यादा/यश शोधणे.

## २.१० गृहितके :

वैज्ञानिक संशोधन वा सामाजिक संशोधन करीत असतांना पूर्वज्ञान असावे लागते. या प्रारंभिक ज्ञानाआधारे संशोधक आपल्या विषयासंबधी कोणतेही सामान्य अनुमान किंवा सिद्धांत पुढील संशोधनासाठी मार्गदर्शक ठरेल अशा पद्धतीने वापरतो. पूर्वज्ञान व विषयज्ञान यांच्या

आधारे संशोधन समस्येसंबधी बांधलेला अंदाज म्हणजे गृहितकृत्य किंवा सिद्धांत कल्पना होय. डॉ. पु.ल.भांडारकर यांच्यामते, “संशोधक संशोधन फलप्रद करण्यासाठी तथ्ये अशा प्रकारे संकलित करण्यात आली पाहिजेत की त्यायोगे एखाद्या विधानाचे या दृष्टीकोनाचे खंडन होऊ शकते. असा दृष्टिकोन किंवा विधान म्हणजे गृहितकृत्य होय.” [४१]

संशोधनाच्या प्राथमिक अवस्थेत आपल्या क्रिया-विचारांना तथ्य संकलनात पायाभूत होणारे गृहितक एखादा अंदाज किंवा कल्पना असू शकेल. गुड व हॅट यांच्यामते, ज्या विधानाची सत्यासत्यता पडताळून पाहण्याची स्थिती आहे वा पाहणे शक्य आहे त्या विधानास गृहितक म्हणतात. [४२]

वृत्तपत्रे संवादाचे कार्य अखंडपणे करीत असतात त्याचे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक अशा सर्वच क्षेत्रावर दुरगामी परिणाम होतात. समाजाच्या सर्व पैलूंवर वृत्तपत्रातील विचार प्रसारणाचे परिणाम होत असल्याने समाजाचे प्रतिनीधित्व करणारा तो एक महत्त्वाचा घटक आहे. अशा विषयातील संशोधनात म्हणून गृहितकृत्याला महत्त्व आहे. गृहितकृत्ये लक्षात घेऊनच संशोधनाची दिशा ठरवली जाते. गृहितकृत्य असे असावे की, त्याच्या आधारे संशोधनास योग्य दिशा व चालना मिळेल. गृहितकृत्यामुळे संशोधनात हेतू वा उद्दिष्ट प्राप्त होते व पुरेशा पुर्वज्ञानावर आधारीत असल्यास गृहितकृत्ये संशोधनकार्यास दिशा प्रदान करु शकतात त्यामुळे अशी गृहितकृत्य क्रमाने मांडावी लागतात.

या सर्व व्याख्यांच्या विश्लेषणावरुन असे स्पष्ट होते की, गृहितकृत्ये ही पुढील सिद्धांतास बळकटी देणारे दिशादर्शक तत्व असते. “मनोरंजनात्मक पत्रकारितेचा चिकित्सक अभ्यास दै. संध्यानंद व दै. लोकमत वाचकांच्या विशेष संदर्भात या विषयावरील प्रस्तुत संशोधनासाठी पुढील गृहितकृत्य मांडण्यात आली आहेत.”

१. मनोरंजनात्मक पत्रकारितेचा संवाद हा वाचकांशी संबंधित असतो.

२. मनोरंजनात्मक पत्रकारिता ही वैचारिकसंवादाची मुख्य विचारधारा मानवाच्या रंजनासंबधी माहिती संकलित करण्यावर भर देणारी आहे.
३. मनोरंजनात्मक पत्रकारिता आधुनिक वृत्तपत्रीय व्यवसायातील परिणामकारक संवाद ठरतो आहे.
४. मनोरंजनात्मक पत्रकारितेचा वाचक हा या पत्रकारितेच्या विकासाला पुरक आहे.
५. जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण यामुळे संपूर्ण जगभरातच सामाजिक, सांस्कृतिक व रंजनात्मक पत्रकारितेला महत्व प्राप्त झाले आहे.

## २.११ संशोधनाच्या मर्यादा :

कोणत्याही संशोधन कार्यात प्राप्त परिस्थितीत काही मर्यादा स्वाभाविकपणेच पडतात या मर्यादाचे भान ठेवूनच संशोधनाची दिशा ठरविली जाते. या अभ्यासासाठी अध्ययनाच्या काही मर्यादा आहेत त्या मर्यादा लक्षात घेणे आवश्यक आहे.

"मनोरंजनात्मक पत्रकारितेचा चिकित्सक अभ्यास या संशोधनाच्या गृहितकृत्यांचा मागोवा घेतांना व प्रादेशिक वृत्तपत्रातील मनोरंजनात्मक पत्रकारितेचा अभ्यास करतांना प्रस्तुत संशोधनाच्या मर्यादा पुढीलप्रमाणे नोंदविता येतील."

१. हा अभ्यास 'दै. संध्यानंद' व 'दै. लोकमत' या दोन दैनिकांशीच निगडित आहे.
२. या अभ्यासात मनोरंजनात्मक पत्रकारितेसंदर्भात इतर भाषिक वृत्तपत्रांशी तुलना करता आली नाही.
३. नवीन अभ्यासविषय असल्यामुळे आणखी वृत्तपत्रांचा अभ्यासात समावेश करता आला नाही.
४. हा अभ्यास केवळ मराठवाडा प्रक्षेत्राशी निगडित आहे.

५. हा अभ्यास केवळ दहा घटकांशी निगडित आहे. त्याची तुलना याठिकाणी प्रस्तुत विषयामध्ये केली आहे.

६. मनोरंजक पत्रकारितेचा बदलता चेहरा अभ्यासतांना वृत्तपत्रे व दृकश्राव्य साधने यांच्या समीक्षेचा विचार केला आहे.

## २.१२ समारोप

जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण यामुळे संपूर्ण जगभरातच सामाजिक बदल घडून येत आहेत. लोकांच्या राहणीमान व जीवन मानात तसेच दृष्टीकोनातही बदल होत आहेत नवीन शतकातील होणाऱ्या बदलाचे प्रतिबिंब वृत्तपत्रांच्या आशयातून प्रकट होत आहे. 'मनोरंजनात्मक पत्रकारिता' हे नवे क्षेत्र माध्यम क्षेत्रात झपाट्याने विकसित होत आहे. अशा प्रकारे या प्रकरणामध्ये मनोरंजनात्मक पत्रकारितेचा चिकित्सक अभ्यास केला आहे. संशोधन प्रणालीचा विचार केला आहे. अन्वेषणात्मक संशोधन आराखडा वापरुन त्या आधारे विविध घटकांचा आढावा कसा घ्यावयाचा तेही स्पष्ट केले आहे. या प्रकरणामध्ये हे सर्व विवेचन संशोधन प्रक्रियेशी निगडीत आहे या अध्ययनामध्ये आशयविश्लेषण व सर्वेक्षण ही दोन तंत्रे वापरली आहेत त्यांचा वापर कसा केला तेही येथे स्पष्ट केले आहे. या अभ्यासामध्ये हे सर्व पैलू या अभ्यासाशी निगडित असून त्यांची शास्त्रीय मांडणी या प्रकरणात केली आहे. पुढील प्रकरणात मनोरंजनात्मक पत्रकारितेशी संबधित साहित्याचा आढावा घेण्यात येणार आहे.

**संदर्भ सुची :**


१. Macluhan Marshal, Understanding media, Sage Publication London, 1956, P-12
२. Doob L.W., Public opinion and propaganda, Henry floot g.w., New York, 1948, P-73
३. Learner and Sehram Wilber, Communication and change in developing countries, East west Centre Press, Hawai, USA 1967, P-86.
४. Learner and Schram- Comm. And change in devp. Countries, East West Center Press, Hawai, USA 1967 P. 86
५. Mahajan Kamlesh - Communication and society, classical Pub. Co. New Delhi, 1990, P-90.
६. Mahajan Kamlesh - Op. Cit. P- 41.
७. Barthel Manfred, Mass media & Men, New-york, 1968, P-61
८. Pearson Karl, The Grammer of Science, Black Pub. London 1911, P-10.
९. डॉ. भांडारकर पु.ल. - सामाजिक संशोधन पध्दती, महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपुर, १९८७, पृ.२.
१०. Heraled Edward - Social Responsibility of Press, East-West Centre Press, Honolulu, V.J.A., P-102.
११. बर्जर, ए.ए., मिडिया अन्यालिसेस टेक्नीक सेज प्रकाशन लंडन, १९८२, पृ. १८२.
१२. धारुरकर वि.ल., आजकालची पत्रकारिता, चैतन्य प्रकाशन औरंगाबाद, १९८५, पृ.३३
१३. घाटोळे रा.ना., समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व व्यवहार मंगेश प्रकाशन, नागपुर, पृ. १३.
१४. कित्ता पृ. १६

१५. कित्ता पृ. १७

१६. Ghosh B.N. - Scientific method & social Research, P-160.

१७. Mahajan Kamlesh- Opcit - P.-90

१८. Robinson D.S. - Radio Comes to farmers, P. Lazerfied & F.N. Stantson (Ed.) New York, १९४१, P-77.

१९. Jahoda Saltish, Ferk Stuard - Research Methods in social Relations, Holt, Rinehart & Winston, New York, 2004, P-31.

२०. Karl Pearson - Ibid P-182.

२१. भांडारकर, पु.ल. - उपरोक्त, पृ. १३४.

२२. बोधनकर सुधीर, सलोनी विवेक, सामाजिक संशोधन पध्दती, साईनाथ प्रकाशन नागपुर, १९९९, पृ.१०३

२३. भांडारकर, पु.ल. - उपरोक्त, पृ. ६७.

२४. Sheilds Patricia and Rangrajan - www.wikipedia, Exploratory Research

२५. भांडारकर, पु.ल. - उपरोक्त, पृ. ६९.

२६. कित्ता, पृ. ६९.

२७. प्रा. काचोळे, दा.धो.- सामाजिक संशोधन पध्दती, कैलास प्रकाशन औरंगाबाद, १९९३, पृ. ६८.

२८. भांडारकर पु.ल. - उपरोक्त, पृ. ६९.

२९. घाटोळे रा.ना., उपरोक्त पृ. १५८.

३०. भांडारकर, पु.ल. - उपरोक्त, पृ. १३७.

३१. कित्ता, पृ. १३७.

३२. कित्ता, पृ. १३८.

३३. Berzer A.A. Opcit, P - 88.

३४. भांडारकर पु.ल. - उपरोक्त, पृ. ३४.

३५. Ghosh B.N. - Scientific Method and social Research, Sterling Pub. New Delhi, 1996, P-57.

३६. Beraslon B. - Analysis in communicaton Research Free press New York, १९५९, P-89.

३७. भांडारकर, पु.ल. - उपरोक्त, पृ. २३४.

३८. कित्ता, पृ. २३५.

३९. Young P.V. - Scientific Social survey and Research, Prentice - Hill India New Delhi, 1973, P-30.

४०. घाटोळे रा.ना., उपरोक्त पृ. ३६.

४१. भांडारकर, पु.ल. - उपरोक्त, पृ. ६८.

४२. Good & Halt - Method in social science research Mcgraw Hill book co., New York, 1952, P-23.